## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ४३९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ०९/०६/२०१७

**१) अमली पदार्थ विरोधी पथक याची कारवाई . :–**

दिनांक ०७/०६/२०१७ चे २१.१० वा. दरम्यान यातील आरोपीचे ताब्यातुन १) एक पारदर्शक पॉलीथीन मध्ये दोन ग्रॅम ५५५ मिली ग्रॅम ब्राऊर शुगर गर्द किंमती २,५५५/–रु. २) एका ब्राऊन रंगाच्या लिफाप्यात ३० कागदपत्रे तुकडे ब्राऊन शुगर गर्द पुडयाचे पांढऱ्या रंगाचे किंमती ००/–रु. ३) एक बिना नंबरची बजाज पल्सर २२० मोटार सायकल किंमती ७०,०००/–रु. असा एकुण किंमती ७२,५५५/–रु. चा माल मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. नारायन सावने अमली पदार्थ विरोधी पथक पोलीस कार्या. भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोस्टे. भंडारा येथे कलम ८(क),२२(ब)एनडीपएस ॲक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चाबुकस्वार पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**२) घराचे विहीरीला लावलेली विद्युत मोटार पंपाची चोरी . :–**

दिनांक ०७+०८/०६/२०१७ चे २२.०० चे ०८.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नविन जगदीश उपाध्याय वय ३९ वर्ष, रा. गुरुनानक वार्ड तुमसर याचे घरचे विहीरीला लावलेली विद्युत मोटार पंप व्ही.व्ही. एस कंपनीची नं. ५८४४७ किंमती ४५००/–रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) विहीरीमध्ये कुदुन महिलेचा मृत्यु :–**

दिनांक ०८/०६/२०१७ चे ०३.१५ ते ०५.३० वा. दर. यातील मृतक सविता चिंतामन फंदी वय ४२ वर्ष, रा. कोसरा हिला गंभिर आजार असुन ती आजाराने त्रासुन गेली होती ती बाहेर संडासला घरुन निघुन जाऊन बाजार चौक कोंढा येथील विहीरीमध्ये कुदुन आत्महत्या केल्याने फिर्यादी शिवशंकर गणपत फंदी वय ५९ रा. कोसरा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**४) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :–**

दिनांक २५/०५/२०१७ चे १०.३० वा. दर. यातील मृतक राजेश श्रावण राऊत वय ३० वर्ष, रा. वरठी रोड बजाज मेटलचे मागे टाकळी भंडारा हा दारु पिण्याच्या सवईचा असुन मृतकने दारु पिऊन प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे भरती करुन औषधोपचार केला व तेथुन एम. ओ. सा यांनी रेफर केल्याने पुढील उपचारा कामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र आज रोजी प्राप्त झाल्याने पो.स्टे भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. मोरे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०८/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०८ तीन सिटर वाहनांवरती १७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८९ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.